SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004,
MAHARASHTRA
PHONE : EPABX - 2609000, Special Cell- (0231) 2609148
Website - www.unishivaji.ac.in E-mail- spcell@unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर — ४१६ ००४, महाराष्ट्र
विशेष कक्ष
दूरध्वनी — ईपीएबीएक्स — २६०९०००, विशेष कक्ष — (०२३१)२६०९१४८
वेबसाईट— www.unishivaji.ac.in, ई—मेल — spcell@unishivaji.ac.in

Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

जा.क्र.विशेष कक्ष/ ६१५/२०२४-२५ दिनांक : 20 JUN 2024

प्रति,
प्राचार्य,
पदमश्री डॉ.ग.गो.जाधव महाविद्यालय,
गगनबावडा, जि.कोल्हापूर.

विषय :— स्थानिक निवड समितीमार्फत केवळ तात्पुरत्या स्वरुपात तासिका तत्वावरील अध्यापकांच्या पदांच्या जाहिरात मान्यतेबाबत....

संदर्भ :— १. शासननिर्णय क्र.संकिर्ण/२०१८/(१८५/१८)/मशि—३ दि.१४/११/२०१८
२. शासननिर्णय क्र.संकिर्ण/२०२१/प्र.क्र.१८१/२१/विशि—१ दि.१७/१०/२०२२
३. जा.क्र. विससं/उशि/कोवि/अ.नि.१/तासिकामान्यता/२०२४/२४३०, दि. ०४/०६/२०२४ चे तासिका तत्वावरील अध्यापकांना तात्पुरत्या नियुक्तीकरीता ना—हरकत प्रमाणपत्राबाबतचे पत्र.
४. आपला प्रस्ताव जा.क्र. १२१/२०२४—२५, दि.१३/०६/२०२४ या कार्यालयास प्राप्त दि. १५/०६/२०२४ चा जाहिरात मान्यतेचा प्रस्ताव.

महोदय,

उपरोक्त विषयसंदर्भात आपणास कळविण्यात येते की,

१. आपण सादर केलेला तासिका तत्वावरील (CHB) अध्यापक पदांचा जाहिरातीचा मसुदा वरील संदर्भ क्र. ०३ नुसार दुरूस्तीसह मान्य करून सोबत पाठविण्यात येत आहे.
२. स्थानिक निवड समितीमार्फत केवळ तात्पुरत्या स्वरुपात तासिका तत्वावर अध्यापक पदे भरण्यासंदर्भातील सोबतची जाहिरात ही सीनिक/जिल्हास्तर पातळीवर व विद्यापीठ आणि संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी. विद्यापीठ संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यासाठी संस्थेने रू.२,५९३/— व जी.एस.टी (१८ टक्के) Sales Invoice करुन अंदाजपत्रकीय शिर्षक **A.56.R.3** मध्ये जमा/भरणा करावे व शुल्क भरलेल्या पावती/चलनसह समन्वयक, इंटरनेट कक्ष, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व विशेष कक्ष, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना पाठवावी.
३. संस्थेने जाहिरात प्रस्तावान्वये मागणी केल्यानुसार तासिका तत्वावरील पदे वॉक—इन—इंटरव्ह्यू (समक्ष मुलाखत) द्वारे भरण्यासाठी जाहिरातीस मान्यता देण्यात आली आहे. तथापि, या जाहिरातीसंदर्भात कोणत्याही प्रकारची तक्रार/हरकत विद्यापीठास रास्त वाटल्यास मंजूर करून दिलेली जाहिरात तात्काळ रद्द करण्यात येईल.
४. संस्था/महाविद्यालय यांनी तात्पुरत्या स्वरूपात भरावयाची सोबतच्या जाहिरात मसुद्यातील तासिका तत्वावरील अध्यापक पदांची भरती वरील संदर्भ क्र. १ व २ नुसार शासन निर्णयामधील अटी व शर्तीचे, कालबध्द कार्यक्रम यांचे तंतोतंत पालन करून करावयाची आहे, तसेच संदर्भ क्र.३ नुसार विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांच्या नाहरकत प्रमाणपत्रातील अटी व शर्तीचे पालन करणे बंधन कारक आहे.
५. शासनाकडून वेळोवेळी अंमलात येणाऱ्या सूचना, अधिसूचना, अधिनियम, परिपत्रके/शासन निर्णय व वरील संदर्भ या सर्वातील अटी महाविद्यालयास/संस्थेस लागू राहतील याची नोंद घ्यावी.

कळावे,

आपली विश्वासू,

उपकुलसचिव,
विशेष कक्ष,
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

प्रत : संलग्नता टी.१/टी.२/प्लेसमेंट सेल/लेखा विभाग/इंटरनेट कक्ष

आनंदी शिक्षण प्रसारक मंडळ, कळंबे तर्फ कळे

**पदमश्री डॉ.ग.गो.जाधव महाविद्यालय, गगनबावडा**

ता.गगनबावडा, जि.कोल्हापूर.

## जाहिरात

**समक्ष मुलाखती (Walk-In-Interview)**

**शैक्षणिक वर्ष २०२४–२५ करिता स्थानिक निवड समितीमार्फत केवळ तात्पुरत्या स्वरुपात तासिका तत्वावर (CHB) खालील विषयांची अध्यापक पदे भरावयाची आहेत :**

| अ.क्रं. | विषय | तासिका तत्वावरील ना–हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेली पदे |
|---|---|---|
| १. | ग्रंथपाल | ०१ |
| २. | शा.शि.संचालक | ०१ |
| ३. | इंग्रजी | ०१ |
| ४. | संख्याशास्त्र | ०१ |

**शर्ती व अटी :**

१. उपरोक्त तासिका तत्वावरील पदे महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने निर्गमित केलेला
   **१. शासन निर्णय क्र. संकीर्ण–२०१८/(१८५/१८)/मशि–३, दि. १४.११.२०१८**
   **२. शासन निर्णय क्र. संकिर्ण/२०२१/प्र.क.१८१/२१/विशि–१, दि.१७/१०/२०२२**
   सदर शासन निर्णयातील निर्देशानुसार केवळ तात्पुरत्या स्वरुपात भरण्यात येत असून या शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती उपरोक्त पदे भरण्यासाठी लागू आहेत.

२. उपरोक्त तासिका तत्वावरील पदे भरण्यासाठी मा. विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांनी **जा.क्र.विससं/उशि/कोवि/अ.नि.१/तासिकामान्यता/२०२४/२४३०, दि.०४/०६/२०२४** अन्वये ना–हरकत प्रमाणपत्र दिलेले असून त्यानुसार ही जाहिरात देण्यात येत आहे. शासनाच्या या ना–हरकत प्रमाणपत्रातील सर्व अटी व शर्ती उपरोक्त पदे भरण्यासाठी लागू आहेत.

३. तासिका तत्वावरील अध्यापकांची (CHB) एका शैक्षणिक वर्षासाठी (जास्तीत जास्त ०९ महिन्यांसाठी) तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यात येईल व तदनंतर सदर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल. त्यामुळे नियमित सेवेचे कोणतेही हक्क तासिका तत्वावरील नियुक्त अध्यापकास प्राप्त होत नसून भविष्यात सेवेत कायम करण्याची मागणी/नियमित सेवेच्या कोणत्याही हक्काची मागणी त्यास करता येणार नाही

४. शासनाने दिलेल्या निर्देशानुसार नेमलेल्या अध्यापकाने एकावेळी एकाच महाविद्यालयात काम करत असल्याबाबतचे, इतर महाविद्यालयामध्ये काम करत नसल्याबाबतचे हमीपत्र रु. १००/–च्या स्टॅप पेपरवर संबंधित संस्था/महाविद्यालय यांना सादर करणे आवश्यक आहे.

५. सदर जाहिरात विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.unishivaji.ac.in) अर्जदारांना अवलोकनासाठी व माहितीसाठी उपलब्ध आहे.

६. इच्छुक उमेदवारांनी दि. ———————— रोजी ———————— वा. अर्ज व आवश्यक त्या मूळ कागदपत्रासह व झेरॉक्स प्रतींसह संस्था/महाविद्यालयात उपस्थित रहावे.

स्थळ :

दिनांक :

प्राचार्य,
पदमश्री डॉ.ग.गो.जाधव महाविद्यालय,
गगनबावडा

अध्यक्ष,
आनंदी शिक्षण प्रसारक मंडळ
कळंबे तर्फ कळे

**APPROVED**

Dy. Registrar
Special Cell
Shivaji University, Kolhapur